अस्वीकृती

ह्या वर्तमानपत्रांत प्रकाशित झालेल्या कोणत्याही जाहिरातीमध्ये करण्यांत आलेल्या दाव्यांच्या खरेपणा किंवा सत्यतेसाठी नवशक्ति कोणतीही हमी देत नाही. अशा जाहिरातींवर कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी स्वतः चौकशी करण्याचे किंवा तज्ञांचा सल्ला घेण्याबाबत वाचकांना सूचवण्यांत येते.

ह्या वर्तमानपत्रांत प्रकाशित झालेल्या किंवा अधिकृत वेबसाईटवर ई पेपर मध्ये अपलोड केलेल्या कोणत्याही जाहिरातीमधील कोणत्याही तथाकथित दिशाभूल करणाऱ्या किंवा बदनामीकारक मजुकरासाठी किंवा त्यामधील दाव्यांसाठी भारतात किंवा परदेशातील कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी विधी न्यायालयात किंवा न्यायाधिकरणात नवशक्तिच्या मुद्रक, प्रकाशक, संपादक आणि प्रोप्रायटर यांना जबाबदार धरता येणार नाही. ते दायित्व सर्वस्वी जाहिरातदारांचे असेल ज्यामध्ये नवशक्तिची कोणतीही भूमिका असणार नाही.

CHANGE OF NAME

NOTE

Collect the full copy of Newspaper for the submission in passport office.

I CHANGE MY NAME FROM : DAYASHANKER YADAV TO : DAYASHANKAR MUNNILAL YADAV VIDE GOVERNMENT OF MAHARASHTRA GAZETTE NO : MR-2654765 DTD. MAY 14 - 20 , 2026 CL-182

I CHANGE MY NAME FROM : SHABANA BANU CHANBASHA SYED TO : SHABANA BANU IJAS AHMED SYED VIDE GOVERNMENT OF MAHARASHTRA GAZETTE NO : M-2654653 DTD. MAY 14 - 20 , 2026 CL-183

I HAVE CHANGED MY NAME FROM SRIVENKATESHWAR SANKARANARAYANAN TO SRIVENKATESHWAR SANKARANARAYANAN IYER AS PER MY DOCUMENTS CL-220

I HAVE CHANGED MY NAME FROM KAJAL DILIP CHADHA TO KAJAL AMIT KOHLI BY AFFIDAVIT NO.88AB721627, DATED 17.06.2026 CL-230

I HAVE CHANGED MY NAME FROM AKRUTI RUDRESH KADGANNAVAR TO AKRUTI SETTY VASSHODIA AS PER AADHAR CARD NO XXXX XXXX 2721 CL-240

I, UJVALA IS LEGALLY WEDDED SPOUSE OF NO. 2760756, RANK- PLNK (SEPOY) NAME:- VASANT GANGARAM SURVE, RESIDING AT 1/8, SITABAI MOTIRAM PATIL CHAWL, KAJUPADA, PATIL COMPOUND, BORIVALI (EAST), MUMBAI-400 066, HAVE CHANGED MY NAME FROM UJVALA TO UJWALA VASANT SURVE AND DATE OF BIRTH FROM 01-05-1954 RECORDS TO 01-05-1954 DUE TO ERRONEOUSLY ENDORSED. VIDE AFFIDAVIT NO. 2663/ DATED 16-06-2026. CL-261

I HAVE CHANGED MY NAME FROM LATHA V PILLAI TO LATHA VIKRAM PILLAI,AS PER DOCUMENT CL-270

I JAYA AMRITLAL MEHTA RESIDENT OF 603, GOOLA MANSION, GROUND FLOOR, FLAT NO -8, JAME JAMSHED ROAD, MATUNGA MUMBAI - 400019 HAVE CHANGED MY NAME TO JAYA MUKUND MEHTA AS PER MAHARASHTRA GAZETTE NO M- 26116360 AFTER MARRIAGE CL-484

"MANDARR ARUN S/O ARUN GAJANAN POLEKAR R/O A/602, DHANLAXMI SOCIETY, ANDHERI-GHATKOPAR LINK ROAD, SAKINAKA, MUMBAI - 400072, CHANGED MY NAME TO MANDAR ARUN POLEKAR" CL-652

I KARAN RAVI CHOPRA RESIDING AT B-1502, SWEET HOME MHADA LAYOUT, S.V.P. NAGAR, VERSOVA, ANDHERI WEST, MUMBAI 400 053 HAVE CHANGED MY NAME TO KARAN CHOPRA AS PER GAZETTE NO: (M-26133391). CL-839

I HAVE CHANGED MY NAME FROM RIZWAN AHMED FAZAL AHMED TO RIZWAN AHMED SHAIKH AS PER DOCUMENTS. CL-840

I HAVE CHANGED MY NAME FROM M NABEEL FOUZAN RANAWADIA TO NABEEL FOUZAN RANAWADIA AS PER GOVT. OF MAHARASHTRA GAZETTE NO. (M-25504917). CL-840 A

WE MR. RISHABH JAIN AND MRS. NEHAL JAIN HAVE CHANGED OUR MINOR SON'S NAME FROM MAAHIT RISHABH JAIN TO MAAHIR RISHABH JAIN AS PER GOVT. OF MAHARASHTRA GAZETTE NO. (M-26115913). CL-840 B

जाहीर सूचना

माझी अशील सौ. फाल्गुनी संजीव शाह, दिवंगत श्री. संजीव शाह यांच्या पत्नी (ज्यांचे दिनांक ०५/०६/२०२३ रोजी निधन झाले), यांनी बॉम्बे उच्च न्यायालय, टेस्टामेंटरी व इंटेस्टेट अधिकारक्षेत्रामध्ये टेस्ट. पेट. क्र. ३४५ सन २०२५, टीपी/३४५/२५ (मृत्युपत्र क्र. १४१ सन २०२५) मध्ये फ्लॅट क्र. ८०१, ८ वा मजला, ए विंग, क्षेत्रफळ १४३.५५ चौ. मीटर (बिल्ट-अप), अनंत भूमी को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., दामू अण्णा दाते मार्ग, महावीर नगर, सेक्टर १, कांदिवली (प.), मुंबई - ४०००६७ येथील दिवंगत श्री. संजीव शाह यांच्या ५०% हिस्सा, हक्क, स्वत्व व हितसंबंधाबाबत, शेअर सर्टिफिकेट क्र. ०३ अंतर्गत विशिष्ट क्र. २१ ते ३० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेल्या मिळकतीसंदर्भात प्रोबेट प्राप्त केले आहे.

सदर फ्लॅटवर जर कोणत्याही व्यक्तीचा कायदेशीर वारसाहक्क, गहाण, भेट, भाडेपट्टा, वारसा, धारणाधिकार किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा दावा असेल अथवा सदर फ्लॅटबाबत काही हरकत असेल, तर अशा व्यक्तीने ती लेखी स्वरूपात खाली नमूद केलेल्या कार्यालयाच्या पत्त्यावर, या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत अधोहस्ताक्षरी यांना कळवावी. त्यानंतर अशा सर्व दावा हक्कांना शून्य व अवैध घोषित करण्यात येईल आणि असे दावे, असल्यास, न्यायालयीन निर्णयानुसार त्याग केलेले मानले जातील.

ॲड. रमेश पांडे
कार्यालय क्र. सी/२, तळमजला,
कांचन स्मृती बिल्डिंग, ठाकूर व्हिलेज,
कांदिवली (पू.), मुंबई - १०१.
मोबाईल : ९८२१३४२३५२.

दिनांक : १८/०६/२०२६ **ठिकाण : मुंबई**

जाहीर सूचना

सर्व संबंधित व्यक्ती, अधिकृत रहिवाशी, पर्यावरण विषयक मंडळे, एन.जी.ओ. आणि इतर यांना या जाहीर सूचनेद्वारे असे कळविण्यात येते की राज्य पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरण महाराष्ट्र राज्य यांनी खालील वसाहत बांधकामासाठी पर्यावरण अनुमती प्रदान केली आहे. मेसर्स किमिडटाऊन डेव्हलोपर्स प्राव्हेट लिमिटेड, ७०२, नटराज, एम.व्ही. रोड जंक्शन,प.द्रुतगती मार्ग,अंधेरी पूर्व,मुंबई - ४०० ०६९, क्लस्टर पुनर्विकास योजना (CDS) सीएस क्र. १/८९, २/८९, सॉल्ट पॅन विभाग आणि सीएस क्र. २/१२ (भाग), ५ (भाग) आणि १२ (भाग) सायन विभाग, जीटीबी नगर, सायन कोळीवाडा, एफ/एन वॉर्ड. तर्फे मेसर्स किमिडटाऊन डेव्हलोपर्स प्राव्हेट लिमिटेड, पत्र क्रमांक- SIA/MH/INFRA२/५८०३१५/२०२६ दिनांक १०/०६/२०२६, सदर पत्राच्या प्रति महाराष्ट्र शासन, पर्यावरण अनुमती विभाग, मंत्रालय व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे https://parivesh.nic.in/ या वन व पर्यावरण मंत्रालयाच्या वेबसाईटवर पाहू शकता.

संचालक
मेसर्स. किमिडटाऊन डेव्हलोपर्स प्राव्हेट लिमिटेड,.
७०२, नटराज, एम.व्ही. रोड जंक्शन, प. द्रुतगती मार्ग,
अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०६९.

जाहीर नोटीस

ह्या नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, **गाव मौजे चिखलडोंगरे, ता. वसई, जि. पालघर** येथील सर्व्हे नं. ३९, हिस्सा नं. १, क्षेत्र ०-१५-६० (हे.आर.चौ.मी), आकार १-१९ (रु.पैसे) त्यापैकी क्षेत्र ०-०७-८० (हे.आर.चौ.मी), आकार ०-६० (रु.पैसे) (यापुढे संक्षिप्ततेसाठी "सदर मिळकत" असे संबोधण्यात आलेले आहे). सदर मिळकत **श्री. अनंत जोमा पाटील, राहणार चिखलडोंगरे,ता.वसई. जि. पालघर** यांच्या मालकी कब्जेवहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलास कायमस्वरुपी विकत देण्याचे ठरविले आहे. तरीही, सदर मिळकतीबाबत कोणत्याही स्वरुपाची हरकत, अधिकार, वहिवाट, शेअर, विक्री, गहाण, लिज, परवाना, बक्षिस, कब्जा, बोजा असल्यास तसे लेखी योग्य त्या पुराव्यासकट खाली नमूद केलेल्या पत्त्यावर आजपासून **१४ दिवसाचे** आत कळवावे. अन्यथा आपला काहीही हक्क नाही व तो असल्यास आपण सोडला आहे असे समजून व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अशीलाकरीता,
ॲड. सोनाली एन. मांगेला
शॉप नं. ४,ओम गार्डन, बिल्डींग नं. १, मनवेलपाडा तलाव जवळ, विरार (पु), ता. वसई, जि. पालघर

जाहीर सूचना

याद्वारे तमाम सर्वसामान्य जनतेस सुचित करण्यात येते की, निम्नलिखीत स्वाक्षरीकर्त्यांनी खालील नमूद केलेल्या ४ मालमत्ता ज्या निर्लोन एम्प्लॉईज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत, बिल्डींग नं. ११, १२, १३, एस. व्ही. रोड, गोरेगाव (प), मुंबई ४०००६२ येथे स्थित असून त्या शिवम परिवार डेव्हलोपर्स प्रा. लि. यांच्याकडून सन २०२४ मध्ये ४ स्वतंत्र नोंदणीकृत विक्री करारांद्वारे संपूर्ण/एकत्र मोबदला देऊन पुर्ण मालकी हक्काच्या आधारावर खरेदी केल्या आहेत, सदर डेव्हलोपर्सकडून असे लेखी आश्वासनही देण्यात आले आहे की, या ४ मालमत्तांचा वापर करण्यासाठी ताबा ३० एप्रिल २०२५ पर्यंत किंवा त्यापुर्वी हस्तांतरीत करण्यात येईल. तथापि तसे घडले नाही आणि निम्नलिखीत स्वाक्षरीकर्ता डेव्हलोपर्सकडे ताबा मिळण्याच्या स्थितीबाबत सातत्याने पाठपुरावा करीत राहिले, अखेरीस ४ नोव्हेंबर २०२५ रोजी डेव्हलोपर्सने जानेवारी २०२६ पर्यंत इमारतीचे पुर्णत्वाचे आणि वापराचे प्रमाणपत्र प्राप्त होईल आणि त्यानंतरच ती जागा प्रत्यक्ष वापरासाठी खुली करण्यात येईल असे आश्वासन देवून संबंधित जागेचा ताबा अंतर्गत सजावट आणि सोयीसुविधांच्या कामासाठी निम्नलिखीत स्वाक्षरीकर्त्यांना सोपविला, परंतु त्याऐवजी १० जुन २०२६ रोजी संपूर्ण इमारत बॅरिकेडस् लावून बंद केलेली निम्नलिखित स्वाक्षरीकर्त्यांना आढळली, ज्यामुळे निम्नलिखित स्वाक्षरीकर्त्यांना अंतर्गत सजावट आणि सोयीसुविधांच्या कामासाठी त्यांच्या जागेत प्रवेश करणे अशक्य झाले, डेव्हलोपर्सना त्याबाबत विचारणा केली असता त्यांनी कोणतेही समाधानकारक आणि योग्य असे उत्तरे दिली नाहीत, तसेच बॅरिकेडस् लावण्याच्या या कृतीची आवश्यकता का झाली, याबद्दल कोणतीही लेखी सुचना किंवा माहिती डेव्हलोपर्सने दिलेली नाही, त्यामुळे निम्नलिखित स्वाक्षरीकर्त्यांना डेव्हलोपर्सच्या हेतुंच्या प्रामाणिकपणाबाबत शंका निर्माण झाली आहे. **तमाम सर्वसामान्य जनतेला याद्वारे सुचित आणि सावध करण्यात येते की, निर्लोन एम्प्लॉईज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत, बिल्डींग नं. ११, १२, १३, एस. व्ही. रोड, गोरेगाव (प), मुंबई ४०००६२ येथे स्थित असलेल्या आणि निम्नलिखीत स्वाक्षरीकर्त्यांच्या येथे खालील नमूद केलेल्या ४ मालमत्तांच्या संदर्भात कोणत्याही व्यक्तीकडून त्या खरेदी करु नयेत आणि त्याबाबत अशा व्यक्तीशी व्यवहार करु नयेत.**

मालमत्तेची यादी:

१. निर्लोन एम्प्लॉईज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., बिल्डींग नं. ११, १२, १३, एस. व्ही. रोड, गोरेगाव (प), मुंबई ४०००६२ येथील ई विंग मधील तळ मजल्यावरील दुकान क्र. ७
२. निर्लोन एम्प्लॉईज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., बिल्डींग नं. ११, १२, १३, एस. व्ही. रोड, गोरेगाव (प), मुंबई ४०००६२ येथील ई विंग मधील वरच्या तळ मजल्यावरील कार्यालय क्र. १
३. निर्लोन एम्प्लॉईज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., बिल्डींग नं. ११, १२, १३, एस. व्ही. रोड, गोरेगाव (प), मुंबई ४०००६२ येथील ई विंग मधील वरच्या तळ मजल्यावरील कार्यालय क्र. २
४. निर्लोन एम्प्लॉईज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., बिल्डींग नं. ११, १२, १३, एस. व्ही. रोड, गोरेगाव (प), मुंबई ४०००६२ येथील सी विंग मधील ११व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ११०१

दिनांक: १८.०६.२०२६ सही/-
स्थळ: मुंबई **भगवान जमनादास रायचंदानी**
वकील उच्च न्यायालय
डी स्क्वेअर बिल्डींग, ८०६, ८वा मजला,
दादाभाई रोड, गोकलीबाई स्कुल समोर,
विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०००५६

जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की **आम्ही एम/एस. केएनडी इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजीज लिमिटेड** सीआयएन क्र. यू७४२१०डब्ल्यूबी१९८२ पीएलसी ०३४९४७, ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ७ए, हॉस्पिटल स्ट्रीट, कोलकाता ७०००७२, पश्चिम बंगाल येथे आहे, यांच्या पहिल्या परिशिष्टामध्ये खाली वर्णन केलेल्या जागेच्या मालकी हक्काची चौकशी करीत आहोत.

प्रथम परिशिष्टात वर्णन केलेल्या जागेबाबत किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत (द्वितीय परिशिष्टात वर्णन केलेल्या शेअर्ससह) वारसा, मृत्युपत्रीय देणगी, गहाण, शेअर, तारण, विक्री, हस्तांतरण, भाडेपट्टा, धारणाधिकार, भार, न्यास, देखभाल, सुखभोगाधिकार, भेट, अदलाबदल, ताबा, भाडेकरार, पोटभाडेकरार, परवाना, वहिवाट हक्क, अभिहस्तांतरण, विकास हक्क, विकास हक्कांचे हस्तांतरण, उत्तराधिकार, देखभाल, लिस पेंडेन्स, कर्ज, आगाऊ रक्कम, आदेश, कोणत्याही न्यायालय आणि/किंवा न्यायाधिकरण तसेच/किंवा कर किंवा महसूल किंवा वैधानिक प्राधिकरणांनी दिलेले निर्णय किंवा डिक्री, जप्ती, तडजोड किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, मालकी, दावा, स्वारस्य किंवा मागणी असलेल्या अथवा करणाऱ्या सर्व व्यक्तींनी सर्व संबंधित कागदपत्रांसह त्यांच्या दाव्याची माहिती आमच्या कार्यालयात, ८, हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे, आजच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कळवावी. तसे न केल्यास, अशा व्यक्तींचा दावा असल्यास, तो त्याग केलेला मानला जाईल व आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही आणि असे समजले जाईल व स्वीकारले जाईल की खालील परिशिष्टांमध्ये वर्णन केलेल्या जागा किंवा शेअर्स संदर्भात असा कोणताही दावा किंवा स्वारस्य अस्तित्वात नाही.

एम/एस. केएनडी इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजीज लिमिटेड यांनी असे निवेदन व घोषणा केली आहे की, खालील प्रथम परिशिष्टात नमूद केलेल्या जागेसंबंधी बाचू सोली दुबाश आणि के. एन. दादीना (फाऊंडेशन इंजिनिअर्स) यांच्यामध्ये निष्पादित करण्यात आलेला दिनांक २३ नोव्हेंबर १९८४ चा मूळ करार हरवला किंवा गहाळ झाला आहे आणि योग्य व कसून शोध घेऊनही तो सापडलेला नाही. तसेच तो कोणतेही गहाण, धारणाधिकार, बोजा किंवा अन्य कोणताही हक्क निर्माण करण्यासाठी जमा करण्यात आलेला नाही किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व्यवहारात आणलेला नाही, जो खालील प्रथम परिशिष्टात नमूद केलेल्या जागेवर किंवा तिच्या धारकांच्या फायद्यासाठी लागू होईल. ज्यांच्या ताब्यात दिनांक २३ नोव्हेंबर १९८४ चा मूळ करार असेल, त्यांनी तो आमच्या वरील नमूद पत्त्यावर परत करावा, अशी विनंती करण्यात येते.

वरील संदर्भित प्रथम परिशिष्ट

फोर्ट विभागातील कॅडेस्ट्रल सर्व्हे क्र. १३७ (भाग) असलेल्या आणि रॅम्पार्ट प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या मालकीच्या ''रॅम्पार्ट हाऊस'' नावाच्या इमारतीच्या ६ व्या मजल्यावरील प्रिमायसेस क्र. ६ए, अंदाजे ९१० चौ. फूट बांधकाम क्षेत्रफळ असलेली जागा, जी २२ए-२६ए, के. दुबाश मार्ग (पूर्वी रॅम्पार्ट रोड म्हणून ओळखला जाणारा), फोर्ट, मुंबई ४०००२३ येथे स्थित आहे.

दिनांक १८ जून २०२६.

माणेकशा अँड सेठना
ॲडव्होकेट्स अँड सॉलिसिटर्स
८, हमाम स्ट्रीट, फोर्ट,
मुंबई ४०० ००१.

सूचना

बँक ऑफ इंडिया अमृत तारा स्टाफ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड जिचा पत्ता यारी रोड, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००६१ च्या सभासद आणि सोसायटीच्या इमारतीतील फ्लॅट क्र. १६०३, सी-विंग च्या धारक श्रीमती अरुणा शर्मा यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता ०६/१०/२०२४ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात त्यांची दोन मुले, श्री. प्रतीक महावीर प्रसाद नतासिया आणि श्री. प्रयोग महावीर प्रसाद नतासिया हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. सोसायटी याद्वारे सोसायटीच्या भांडवल/ मिळकतीमधील मयत सभासदाचे सदर शेअर्स आणि हितसंबंधांचे हस्तांतर होण्यास वारस किंवा वारसदार किंवा इतर दावेदार/ आक्षेपदार किंवा अन्य दावेदारी/आक्षेप घेणारे यांच्याकडून दावे किंवा आक्षेप असल्यास ते सदर सूचनेच्या प्रसिध्दीपासून १५ दिवसात सोसायटीच्या भांडवल/ मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्या/ आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुराव्यांच्या प्रतींसह मागवित आहे. वर दिलेल्या मुदतीत जर दावे/ आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर सोसायटीच्या उपविधीतील तरतुदीमधील दिलेल्या मार्गाने सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाचे शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतर करण्यास सोसायटी मोकळी असेल, जर, सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणास काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदीनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल. सोसायटीच्या नोंदणीकृत उपविधीची प्रत दावेदार/ आक्षेपकांद्वारे निरीक्षणासाठी सोसायटीचे कार्यालय/ सोसायटीचे सचिव यांचेकडे सदर सूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून तिचा कालावधी समाप्तीच्या तारखेपर्यंत स. ११.०० ते स. ०५.०० दरम्यान उपलब्ध आहे.

बँक ऑफ इंडिया अमृत तारा स्टाफ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडच्या वतीने आणि करिता
सन्मा. सचिव
दिनांक : १८/०६/२०२६
ठिकाण : मुंबई

जाहीर सूचना

फ्लॅट क्र. ७१, हासा महल, ८९ दलामल पार्क सीएचएस लि., कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५ **(सदर परिसर)**, सदर परिसर जो येथील खालील परिशिष्टात **अधिक विशेषत:** वर्णिलेला आहे चे कायदेशीर मालक आणि भोगवटादार माझे अशील **श्री. लॉरेन व्हिक्टर फ्रॅंकलिन** यांच्या वतीने सर्वसामान्य जनता, सर्व शासकीय प्राधिकरण, न्यायालय, पोलीस प्राधिकरण, पासपोर्ट प्राधिकरण, वित्तीय संस्थाना, बँका आणि इतर सर्व संबंधित व्यक्तींना सूचना याद्वारे कळविण्यात येते की, कृपया पुढील बाबींची नोंद घ्यावी :

१. कोणताही हक्क, नामाधिकार किंवा हितसंबंध नाही: श्री. ॲलन वेलेगलेटी फ्रॅंकलिन (माझ्या अशीलांचे सख्खे भाऊ) हे वरील सदर परिसरात राहत नाही, भोगवटादार नाहीत किंवा कोणताही हक्क, नामाधिकार, हितसंबंध किंवा कोणत्याही स्वरूपाचा दावा धारण करत नाहीत. त्यांना त्यांचा निवास, पत्रव्यवहार, व्यवसाय किंवा संपर्काचा पत्ता म्हणून सदर परिसराचा वापर, प्रतिनिधित्व करण्यास किंवा तसे दर्शविण्यासाठी माझ्या अशीलांनी प्राधिकृत केलेले नाही.

२. प्रलंबित न्यायप्रकरणे : माझे अशील आणि **श्री. ॲलन वेलेगलेटी फ्रॅंकलिन** यांच्यामध्ये भारतातील विविध न्यायालये व मंचांपुढे कौटुंबिक मालमत्ता आणि मिळकत विषयक बाबींशी संबंधित न्यायप्रकरणे प्रलंबित आहेत. **श्री. ॲलन वेलेगलेटी फ्रॅंकलिन** यांनी सदर परिसरामध्ये वास्तव्य, भोगवटा किंवा कोणताही संबंध असल्याचे दर्शविणारे कोणतेही प्रतिनिधित्व केल्यास, ते फसवणुकीने, दुर्भावनापूर्ण हेतूने, गुमपणे, खोटेपणाने, कोणताही आधार नसताना केलेले मानले जाईल आणि त्यास स्पष्टपणे हरकत घेण्यात येत आहे.

३. पत्त्याचा अनधिकृत आणि खोटा वापर : श्री. ॲलन वेलेगलेटी फ्रॅंकलिन यांनी वरील नमूद पत्त्याचा कोणत्याही कारणासाठी केलेला कोणताही वापर ज्यामध्ये अर्ज, प्रतिज्ञापत्रे, निवेदने, पत्रव्यवहार किंवा कोणत्याही प्राधिकरण, न्यायालय किंवा संस्थेसमोरील प्रतिनिधित्व यांचा समावेश आहे परंतु एवढ्यापुरता मर्यादित नाही हा पूर्णपणे फसवणूकपूर्ण, दुर्भावनापूर्ण, अनधिकृत, खोटा असून, माझ्या अशीलांच्या माहितीशिवाय, संमतीशिवाय किंवा परवानगीशिवाय करण्यात आलेला आहे.

४. जनता आणि प्राधिकरणांना सावधानतेची सूचना : सर्वसामान्य जनता, प्राधिकरण आणि संस्था यांना याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी **श्री. ॲलन वेलेगलेटी फ्रॅंकलिन** यांनी वरील नमूद पत्त्यासंदर्भात केलेला कोणताही दावा, प्रतिनिधित्व किंवा घोषणा यांची स्वतंत्रपणे पडताळणी करावी आणि विशेषतः वरील नमूद प्रलंबित न्यायप्रकरणांच्या पार्श्वभूमीवर अशा प्रतिनिधित्वांवर अवलंबून राहू नये.

ही सूचना माझ्या अशीलांच्या सुरक्षितता आणि संरक्षणाच्या हितासाठी, तसेच सार्वजनिक अभिलेखांच्या हितासाठी आणि श्री. ॲलन वेलेगलेटी फ्रॅंकलिन यांच्याकडून सदर जागेचा कोणताही फसवणूकपूर्ण, खोटा किंवा अनधिकृत वापर केल्यामुळे उद्भवू शकणारे चुकीचे प्रतिनिधित्व, गैरवापर किंवा गैरसमज टाळण्यासाठी जारी करण्यात येत आहे.

वरील उल्लेखित परिशिष्ट :

मुंबई शहरच्या जिल्हा नोंदणीतील फ्लॅट क्र. ७१, हासा महल, ८९, दि दलामल पार्क को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५ सह दि दलामल पार्क को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडमधील शेअर प्रमाणपत्र क्र. १५४ धारक विभिन्न क्र. १०६ ते ११० धारक प्रत्येकी रु. ५०/- मूल्याचे पाच (५) शेअर्स.

दिनांक : १८ जून २०२६.

श्री. लॉरेन व्हिक्टर फ्रॅंकलिन यांचे वकील
सही/-
द्वारे जारी : श्री. शेन कार्डोझ,
वकील आणि नोटरी,
जी३, क्लिफर्ड हाऊस, काडेश्वरी मंदिर रोड, सेंट जॉन बॅप्टिस्ट रोड लगत, गणेश मंदिर चौकाजवळ, वांद्रे पश्चिम, मुंबई ४०००५०.
ईमेल : shanecardoz@gmail.com,
संपर्क : ९८२०५१७०२०. यांच्या वतीने: श्री. लॉरेन व्हिक्टर फ्रॅंकलिन, श्री. वेलेगलेटी फ्रॅंकलिन यांचा मुलगा

PUBLIC NOTICE

TAKE NOTICE THAT, we are instructed and authorized by our client to investigate the unencumbered right, title and interest of **Clover Developers Private Limited ("Owner")**; with respect to the **Said Property** (as is more particularly described in the **Schedule** hereunder written) in pursuance to the negotiations for sale of the Said Property between the Owner and our client.

ANY PERSON / ENTITY having any claim, right, title, benefit, interest, objections and / or demand in respect of the Said Property or any part thereof, in any manner either by way of inheritance, share, sale, mortgage, assignment, exchange, lien, license, deposit of title deeds, loan, pledge, gift, occupation, possession, tenancy, sub tenancy, leave and license, lease, sub-lease, transfer of title or beneficial interest under any trust, maintenance, bequest, succession, family arrangement / settlement, litigation, Decree or Court Order, Award of any Court of Law or encumbrance howsoever or otherwise is hereby required to intimate to the undersigned in writing within **14 (Fourteen) days** from the date of publication of this Notice of his / her / it's such claim and / or objection, if any, with all supporting documents duly certified in that regard; failing which the Title of the Owner with respect to the Said Property shall be deemed to be unencumbered and the claim(s) and / or objections, if any, of such person / entity shall be treated as waived and the parties shall proceed with the consummation of the sale.

Kindly note that objection(s) / claim(s), if any have to be in writing and supported by documents (duly notarized as true copies) and addressed to us vide Registered Post A.D. and only then such objection(s) / claim(s) shall be entertained.

SCHEDULE
(Said Property)

Building known as 'Clover Business Centre' standing on all that piece and parcel of land admeasuring 2323 square meters bearing Survey No. 83A/4C (New) and C.T.S. No. 1279, Survey No. 83A/4/2/2 (Old) of village Keshavnagar - Mundhwa, City of Pune, Taluka City Pune, District Pune within the limits of Pune Municipal Corporation situated at North Main Road, Mundhwa, Koregaon Park, Anexe, Pune – 411 036 and bounded as follows:

On or towards the North: by Road
On or towards the South: by Survey No. 83/4, CTS No. 1279 (pt)
On or towards the East : by Survey No. 84 CTS No.1275
On or towards the West : Survey No. 83/3, CTS No.1283 (pt)

Date:18th June 2026

Sd/-
Advocate Ajit N Makhijani
M M Legal Associates
Advocates & Consultants
Chamber: Landmark Pllatinum,
Office No. 1101, 11th Floor, Junction of 34th Road & S. V. Road, Bandra (West),
Mumbai –400 050, India
Tel.: +91 8454881007 / +91 8454841007
E-mail: ajit.mmla@gmail.com

PUBLIC NOTICE

My clients, the children of late Mr. Leo Rodrigues and late Mrs. Monica Mercine Rodrigues, namely 1. Mr. Dennis C. Rodrigues, 2. Mrs. Jacintha Barboza (nee Rodrigues) and 3. Mr. Simon Isidore Rodrigues are the legal heirs of Flat No. 15, 3rd floor, Kiran, St. Pius X CHS Ltd, St. Pius X Road, Mulund West, Mumbai – 400080, CTS No. 551/34 of Plot No. 11, Village-Nahur, Taluka-Kurla, Mumbai Suburban District, and Registration Sub-District of Mumbai.

Their father, late, Mr. Leo Rodrigues, was the first & founder member of ST. PIUS X CHS LTD., and the first owner of the 'said flat' through Share Certificate. Due to misplaced Share Certificate, request letter dated 20/04/2026 and FIR dated 09/06/2026 submitted to the Society for application for Duplicate Certificate.

Late Mr. Leo Rodrigues died intestate on 26/05/2006. Through Nominee Transfer, the 'said flat' was transferred to his wife, Mrs. Monica Mercine Rodrigues. Subsequently Mrs. Monica Mercine Rodrigues died intestate on 17/03/2026, leaving behind her only legal heirs, namely her son, Mr. Dennis C. Rodrigue, her daughter, Mrs. Jacintha Barboza (nee Rodrigues), and her son, Mr. Simon Isidore Rodrigues.

My clients state and declare that they are the only legal heirs of late Mrs. Monica Mercine Rodrigues and there are no other heirs to late Mrs. Monica Mercine Rodrigues.

My clients have approached the society, ST. PIUS X CHS. LTD, Registration No. BOM/HSG/2215 OF 1969, for Transfer of Name & Title from their late mother to their individual names.

Any person/organization etc. having any objection should file their objection within 7 days from date of publication of this Notice with the undersigned. For the abovementioned matter any situation or circumstances my clients will be fully responsible and be bound for that.

Mr. Dennis C. Rodrigues & others

Adv. Shamika S. Surve
Office No. 26, 1st Floor, Maruti Arcade,
Opp. Geeta Collection, J N Road,
Mulund West, Mumbai 400080.
Date: 18/06/2026
Place: Mulund, Mumbai.

जाहीर सूचना
हरवलेल्या दस्तऐवजांकरिता

सर्वसामान्य जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, टर्नर रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०० ०५० येथे स्थित, वसलेल्या आणि अशा गाव वांद्रे, तालुका अंधेरी मधील स्ट्रीट क्र. १५/ए आणि १५/बी अंतर्गत एमसीजीएम द्वारे निर्धारित दोन्ही सीटीएस क्र. एफ-१२३८, १३५७.९ चौरस मीटर्स आणि एफ-१२४०, मोजमापित साधारण ५४३.५० चौरस मीटर्स धारक आणि सर्व्हे क्र. २३५/सी आणि हिस्सा क्र. १ धारक जमीन किंवा मैदानाच्या सर्व त्या भाग आणि विभागावर तेव्हा उभ्या 'पंचशील अपार्टमेंट' (आता पाडलेल्या) अशा ज्ञात इमारतीमधील तळ मजल्यावरील क्र. ए/६ धारक दुकान (आता पाडलेले) च्या संदर्भातील फारुक मेनन आणि मोहम्मद तुफैल अडवानी दरम्यान निष्पादित दिनांक १०.०९.२००७ रोजीचा मूळ विक्री करार हा हरवला आणि गहाळ झाला आहे आणि शोधाशोध करुनही राजकुमार विशिनदास छाब्रिया आणि राव्या कुणाल तलरेजा यांना तपास लागत नाही. यासंदर्भात वांद्रे पोलीस ठाण्यात तक्रार क्र. **५७६९३/२०२६** अशी अदखलपात्र तक्रार देखील नोंदविण्यात आलेली आहे.

कोणाही व्यक्तीकडे वरील नमूद विक्री करार असल्यास आणि/किंवा तो विक्री करार सापडल्यास सदर सूचनेच्या तारखेपासून ७ दिवसात निम्नस्वाक्षरीकारांकडे तो सुपूर्द करण्याची विनंती करण्यात येत आहे, कसूर केल्यास असे गृहित धरण्यात येईल की सदर विक्री करार कायमस्वरूपी हरवलेला आहे.

सर्व व्यक्तींना याद्वारे वरील सदर विक्री कराराच्या आधारे कोणत्याही व्यक्तीशी कोणताही व्यवहार करू नयेत. राजकुमार विशिनदास छाब्रिया आणि राव्या कुणाल तलरेजा वाचुन आणि वगळुन कोणत्याही त्रयस्थ पक्षकारासह केलेला कोणताही व्यवहार हा बेकायदेशीर, अवैध आणि प्रारंभापासूनच शून्य असेल याची कृपया नोंद घ्यावी.

सदर दिनांक १७ जून, २०२६.

·D·S·A·
DIVYA SHAH ASSOCIATES
advocates, solicitors & notaries

जाहीर नोटीस

ॲड. विनोद एल. देसाई
भिवंडी येथील मे दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांचे न्यायालयात

स्पे.मु.नं. २०९/२०२४
निशाणी क्र. १५

रमेश भवरलाल नाहर ...वादी
विरुद्ध
राजेश वाळक्या खंडागळे ...प्रतिवादी

प्रति,
राजेश वाळक्या खंडागळे
पत्ता फ्लॅट नं. ३११, ३ रा माळा
परमेश्वर बिल्डिंग, पूर्णागांव
शंकर मंदिर पूर्णा, पो. काल्हेर,
भिवंडी, जि.ठाणे-४२१३०२ ...प्रतिवादी

ज्याअर्थी तुम्हांस नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वादी यांनी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात मौजे पूर्णा, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील सर्व्हे नंबर १०६/१ पैकी व १०७/१ पैकी वरील बिल्डिंग नं. बी-१, अगरवाल कॉम्प्लेक्स मधील ८(आठ) वाणिज्य गाळा नं. १७ ते २४ क्षेत्र १०,००० स्वे.फुट बिल्टप एरिया पहिला माळा या गाळा मिळकतीने विशिष्ट रितीने कराराची पूर्तता करून मिळणे करिता व नुकसान भरपाई मिळणे करिता दावा दिला आहे.

त्याअर्थी सदर दाव्या संबंधी तुमचे म्हणणे देण्या करिता दिनांक १८-०७-२०२६ रोजी तारीख नेमलेली आहे. त्याकरिता तुम्ही स्वतः अगर तुमचे वकील मार्फत सदर दाव्याचे कामी दिनांक १८-०७-२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. या न्यायालयात हजर व्हावे अन्यथा तुम्हांस काही म्हणणे देणे नाही असे समजून एकतर्फी सुनावणी घेऊन निकाल देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०३/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

हुकुमावर
सही/-

लिपीक	अधीक्षक
दिवाणी न्यायालय,	दिवाणी न्यायालय,
क स्तर,	व स्तर,
भिवंडी	भिवंडी

जाहीर नोटीस

तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, गाव मौजे मायखोप, तालुका व जिल्हा - पालघर, येथील गट नं. ५१०, हिस्सा नं. अ, क्षेत्र ०.३९.०० हे. आर. चौ. मी., पो. ख ०.९०.०० हे. आर.चौ. मी., एकूण क्षेत्र १.२९.०० हे. आर चौ. मी. ही मिळकत श्री. सायमन पिटर कोरीया व १ हयांच्या नावे आहे. सदर मिळकत माझे अशिल मे. जीवा कॉर्पोरेशन तर्फे प्रोप्रायटर, श्री. जीवाणंद राजू देवेंद्रन, पत्ता: बी-२, पटेल प्लाझा, मीरा गांव, मीरा रोड (पू.), ४०१ १०७हे विकत घेणार असून त्या संदर्भात कोणाची ही हरकत असल्यास त्यांनी त्याची लेखी स्वरूपातील माहिती योग्य कागदोपत्री पुराव्यानिशी निम्नस्वाक्षरीकर्ता यांच्याकडे २०१, जय भवानी अपार्टमेंट, दिनदयाल नगर, वसई पश्चिम, ता. वसई, जि. पालघर, येथे या सुचनेच्या प्रसिध्दीपासुन १४ दिवसाच्या आत पाठवावी वर दिलेल्या मुदतीत जर हरकत पोहचली नाही तर सदर जमिनीचा होत असलेला विक्री करार हा हरकत विरहित आणि योग्य आहे व हरकत असल्यास सोडुन दिली आहे असे गृहित धरून सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

ॲड. टेरेंस कोरीया

मुंबई येथील उच्च न्यायालयात
सामान्य मूळ दिवाणी अधिकारक्षेत्र
अंतरिम अर्ज (।) क्र. १४६३७ सन २०२६
सह
अंतरिम अर्ज क्र. ६३६ सन २०२५
मध्ये
अंमलबजावणी अर्ज क्र. ३३ सन २०१८

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड ...अर्जदार
विरुद्ध
शाहिद मोहम्मद रफी ...प्रतिवादी

सार्वजनिक सूचना

प्रति,
शाहिद मोहम्मद रफी, फ्लॅट क्र. ५०१, रफी मॅन्शन, २८ वा रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०००५०.

ज्या अर्थी वरील मथळ्यात नमूद केलेले प्रकरण मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या सामान्य मूळ दिवाणी अधिकारक्षेत्रासमोर प्रलंबित आहे, आणि ज्या अर्थी अर्जदाराने आपल्यावर पर्यायी सेवा बजावणीसाठी अंतरिम अर्ज दाखल केला आहे, माननीय न्यायमूर्ती राजेश एस. पाटील यांनी दिनांक **३० एप्रिल २०२६** रोजी पारित केलेल्या आदेशाद्वारे प्रकाशनाद्वारे सेवा बजावणीस परवानगी दिली आहे.

याद्वारे आपणास कळविण्यात येते आणि आपणास निर्देशित करण्यात येते की आपण स्वतः किंवा वकिलामार्फत मुंबई येथील माननीय उच्च न्यायालयासमोर वरील कार्यवाहीमध्ये हजर राहून, असल्यास, आपले उत्तर/प्रतिज्ञापत्र दाखल करावे, अन्यथा सदर प्रकरण आपल्या विरोधात एकतर्फीपणे कायद्यानुसार पुढे चालविण्यात येईल.

सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक **१३ जुलै २०२६** रोजी निश्चित करण्यात आलेली आहे.

अंतरिम अर्जाची आणि संबंधित कार्यवाहीची प्रत अर्जदाराच्या वकिलांकडून खाली नमूद केलेल्या पत्त्यावर प्राप्त करून घेता येईल.

अर्जदाराचे वकील
एस. आय. जोशी अँड कंपनी,
उच्च न्यायालयातील ॲडव्होकेट्स
पत्ता : केरमानी बिल्डिंग, ब्लॉक क्र. ४ व ५,
दुसरा मजला, सर पी. एम. रोड,
फोर्ट, मुंबई - ४००००१.
दूरध्वनी : २२०२३७४७/५७/६७

ठिकाण : मुंबई
दिनांक : १८-०६-२०२६

जाहीर सूचना

माझे अशिल, नील डी'सिल्वा उर्फ नील बॅसिल डी'सिल्वा यांच्या **सूचनेनुसार**, खालील परिशिष्टात अधिक विशेषतः वर्णन केलेल्या सदनिकेबाबत व त्यास संलग्न असलेल्या शेअर्सबाबत माझ्या अशिलाच्या हक्काची छाननी मी करीत आहे, जी सदनिका व शेअर्स माझे अशिल विकण्याचा व हस्तांतरित करण्याचा मानस बाळगतात. सदर सदनिका दिनांक ०४ मे २०२४ च्या नोंदणीकृत लीव्ह अँड लायसन्स करारानुसार जोस्मी जोसेफ श्राम्पिकल यांना लीव्ह अँड लायसन्स तत्त्वावर देण्यात आलेली आहे.

सदर सदनिका व त्यास संलग्न शेअर्स किंवा त्यातील कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, हस्तांतरण, गहाण, धारणाधिकार, भेट, भार, ताबा, वारसा, मृत्युपत्रीय देणगी, भाडेपट्टा, भाडेकरार, लायसन्स (वरील नमूद केलेला लीव्ह अँड लायसन्स अपवाद वगळून), देखभाल, सुखभोगाधिकार, न्यास, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, अथवा कोणत्याही स्वरूपाचा इतर कोणताही हक्क, दावा, लाभ किंवा हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्ती / संस्थांनी त्याबाबतचा दावा पुराव्यांच्या कागदपत्रांसह लेखी स्वरूपात या सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत अधोलिखितास कळवावा; अन्यथा अशा कोणत्याही दाव्याचा विचार न करता विक्रीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल आणि असा दावा असल्यास तो त्याग केलेला आणि/किंवा सोडून दिलेला मानण्यात येईल.

वरील संदर्भित परिशिष्ट :

सेंट लिओ रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०० ०५० येथे स्थित ''शालोम'' इमारतीतील ''शालोम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड'' मधील तळमजल्यावरील सदनिका क्र. ३, क्षेत्रफळ ८८८.८३ चौ. फूट कार्पेट क्षेत्र, म्हणजेच ८२.६१ चौ. मीटर, सल्सेट कॅथोलिक को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडच्या इस्टेट प्लॅन क्र. १ मधील प्लॉट क्र. १०१/१०२ वर, सीटीएस क्र. सी/४५० व सी/४५१, गाव वांद्रे, तालुका अंधेरी, मुंबई उपनगर नोंदणी जिल्हा येथे स्थित असून, त्यासोबत प्रत्येकी रु. ५०/- मूल्याचे ५ शेअर्स, अनुक्रमांक ११ ते १५, शेअर प्रमाणपत्र क्र. ३ द्वारे दर्शविलेले.

मुंबई, दिनांक १८ जून २०२६.

फिओना नाझारेथ,
ॲडव्होकेट, हायकोर्ट,
ए/१, सिल्व्हर क्लाउड,
सुंदर नगर रोड क्र. २,
कालिना, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई ४०० ०९८.
ई-मेल : contact@fionanazareth.com

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, **लोटस शेरॅटन स्टार**, ही एक भागीदारी फर्म असून तिचे कार्यालय १३०१, लोटस ट्रेड सेंटर, डी. एन. नगर मेट्रो स्टेशन जवळ, न्यू लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००५३ येथे आहे, यांच्या मालकीच्या स्थावर मिळकतीसंबंधित मूळ हक्क कागदपत्रे हरवली/गहाळ झाली असून कसून शोध घेऊनही ती शोधून मिळालेली नाहीत.

मिळकतीचे तपशील खालीलप्रमाणे आहेत :

मिळकतीचे वर्णन :

मुंबई शहराच्या नोंदणी जिल्ह्याच्या हद्दीत असलेली, ताडदेव विभाग, महानगरपालिका वॉर्ड क्र. डी, मुंबई - ४०००३४ येथील कॅडेस्ट्रल सर्व्हे १/३४९, कलेक्टर्स न्यू सर्व्हे क्र. १३८३२ (जुने क्र. ३१२ आणि ३१८) व एल. एस. क्र. २/३३९४ धारण करणारी, ''दुभाष बिल्डिंग'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तळमजला अधिक चार वरच्या मजल्यांच्या बांधकामासह सुमारे २७४.२५ चौ. मीटर क्षेत्रफळाची सर्व ती जमीन.

वरील मिळकतीसंबंधित मूळ कागदपत्रे, ज्यामध्ये दिनांक १० मे २०१२ चा हस्तांतरणखत आणि दिनांक २२ मे २०१२ चा इंडेन्चर ऑफ कन्व्हेयन्स यांचा समावेश आहे परंतु त्यापुरते मर्यादित नाही, ती दिनांक १६ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास हरवली/गहाळ झाली.

सदर बाब संबंधित पोलीस ठाण्यात कळविण्यात आली असून दिनांक १७.०६.२०२६ चा तक्रार/अहवाल क्र. ८०३२६-२०२६ दाखल करण्यात आलेला आहे.

सदर मूळ कागदपत्रे आणि/किंवा वरील मिळकतीसंबंधी ताबा, हक्क, मालकी, स्वारस्य, धारणाधिकार, भार, गहाण किंवा अन्य कोणताही दावा असलेली अथवा करणारी कोणतीही व्यक्ती, बँक, वित्तीय संस्था, कंपनी, प्राधिकरण किंवा संस्था यांनी त्यासंबंधी सर्व पूरक कागदपत्रीय पुराव्यांसह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर या सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून **१५ (पंधरा) दिवसांच्या आत** लेखी स्वरूपात अधोहस्ताक्षरी यांना कळवावे.

असे न केल्यास, सदर मूळ कागदपत्रे आणि/किंवा वरील मिळकतीसंबंधी कोणत्याही व्यक्तीचा कोणताही दावा नाही असे गृहीत धरले जाईल आणि लोटस शेरॅटन स्टार प्रमाणित प्रती, डुप्लिकेट कागदपत्रे प्राप्त करण्याची किंवा योग्य समजल्या जाणाऱ्या इतर कार्यवाही करण्याची प्रक्रिया कोणत्याही व्यक्तीस पुढील संदर्भ न देता सुरू करेल.

स्थळ : मुंबई
दिनांक : १८.०६.२०२६

लोटस शेरॅटन स्टार तर्फे व त्यांच्या वतीने.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात कि, **श्री. लॉरेन्स जोसेफ घोन्सालविस आणि श्रीम. ग्रेसी लॉरेन्स घोन्सालविस, गाव मौजे म्हसवळ, ता वाडा, जि. पालघर येथील सर्वे क्र. २३१, हि. नं. १/३, क्षेत्र ७३.१३.०० (आर.चौ.मी), आकार १०९७ रु.पै.**, अशी जमीन मिळकतीचे मालक असून सदर मिळकत विकण्याचे ठरविले आहे. जर कोणतीही व्यक्ती किंवा संस्था या मालमत्तेवर कोणताही तक्रार/ दावा/ हक्क / शीर्षक / धारणाधिकार / व्याज असेल तर पुराव्यासह ही सूचना प्रकाशित झाल्यापासून **१५ दिवसांच्या** आत खालील दिलेल्या पत्त्यांवर लेखी कळविण्यात यावे. अन्यथा कोणाचे काही हरकत नाही असे समजुन पुढच्या व्यवहार येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही हरकत स्वीकारण्यात येणार नाही.

स्थळ : वसई रोड **सही/-**
दिनांक:१८/०६/२०२६ **ॲड. बासित अन्सारी**
शॉप नं. २, बाबा नगर, नगिनदासपाडा,
विरार रोड नालासोपारा (प) ४०१२०९

State Bank of India
स्ट्रेस्ड ॲसेटस रिकव्हरी शाखा(०५१६८)
६वा मजला, द इंटरनॅशनल, १६, महर्षी कर्वे रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
फोन: ०२२ - २२०५३१६३ / ६४ / ६५
ईमेल - sbi.5168@sbi.co.in

शुद्धिपत्रक

कृपया दिनांक **१६.०६.२०२६** रोजी **फ्री प्रेस जर्नल व नवशक्ती** मध्ये प्रकाशित झालेल्या ई-लिलाव विक्री सूचनेचा संदर्भ घ्यावा. कर्जदार **श्री. नटवर पी. रायचुरा आणि श्रीमती मीता रायचुरा** यांच्याशी संबंधित या सूचनेत, 'नवशक्ती'मधील ई-लिलावाच्या वेळेबाबत चूक झाली होती. कृपया ई-लिलावाची वेळ **'सकाळी १०.०० ते दुपारी ४.००'** ऐवजी **'सकाळी ११.०० ते दुपारी ४.००'** अशी वाचावी. ई-लिलाव विक्री सूचनेतील इतर तपशील तसेच राहतील.

सही/-
दिनांक : १८.०६.२०२६ प्राधिकृत अधिकारी
ठिकाण : मुंबई स्टेट बँक ऑफ इंडिया

जाहीर सूचना

आमच्या अशिलांच्या सूचनेनुसार, आम्ही मलबार आणि कंबाला हिल विभागाचा सी. एस. क्र. २/७८७ (भाग) धारक भुलाभाई देसाई रोड, मुंबई- ४०० ०२६ येथे स्थित **''शिवतीर्थ क्र. २''** म्हणून ज्ञात इमारतीच्या तळ मजल्यावर **क्र. जी-१७ धारक एक गॅरेज** सह वेस्ट विंग मधील ६व्या मजल्यावरील **फ्लॅट क्र. ६०५**, मोजमापित ११०० चौ. फू. समतुल्य १०२.२३ चौ. मीटर्स किंवा आसपास क्षेत्र मधील सर्व लाभकारी हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध आणि न्यू शिवतीर्थ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड चा विभिन्न क्रमांक १९६ ते २०० (दोन्ही समावेशी) धारक प्रत्येकी रु. ५०/- चे ५ (पाच) शेअर्सच्या संदर्भात (१) श्री. हिमांशू जितेंद्र मेहता, (२) श्री. तपन जितेंद्र मेहता, (३) कु. शीतल कमलनयन कापडिया, (४) श्रीम. अमीषा आदित्य दालमिया, (५) श्री. रजनीकांत कुंजविहारी कोठी, (६) मयत हरेंद्र कुंजविहारी दलाल यांचे कायदेशीर वारस- ए) श्रीम. पूर्णिमा हरेंद्र दलाल, बी) श्री. ध्रुव हरेंद्र दलाल, सी) श्रीम. मानसी अमित धनकी, (७) मयत श्रीम. ललिता वसंत शाह यांचे कायदेशीर वारस- ए) श्री. प्रणव वसंत शाह, बी) श्रीम. पिंकी केतन कडाकिया, सी) श्री. केवल वसंत शाह, (८) श्रीम. पद्मा (उर्फ पल्लवी) रमेश कामदार, (९) श्रीम. हर्षा राजेश दोशी, (१०) श्रीम. देवांगना कमल शाह आणि (११) श्रीम. प्रेरणा नारायण मेहता यांच्या नामाधिकाराचा तपास करीत आहोत. कोणत्याही व्यक्ती किंवा व्यक्तींना सदर शेअर्स आणि सदर परिसरासंदर्भात कोणताही दावा असल्यास, त्यांनी ते लेखी स्वरूपात आणि त्यासंबंधी पुष्ठ्यर्थ दस्तावेजी पुराव्यांसह अधोस्वाक्षरीकारांकडे त्यांचे दावे या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत पाठवणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, असे सर्व दावे त्यागित मानले जातील.

कविता जॉली
भागीदार
राजन हिरानंदानी अँड असोसिएट्स
वकील
५०४ ए/बी, नीलकंठ, ९८,
मरीन ड्राईव्ह, मुंबई ४०० ००२.
दिनांक : १८.०६.२०२६

जाहिर सुचना

हयाद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, गांव मौजे ससुनववर, तालुका:वसई, जिल्हा: पालघर येथील जमीन मिळकतीचे वर्णन

जुना सर्वे नं.	नवीन सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र. हे. आर.
९३	१८२	१	१.०३.२
९४	१८३	-	१.०४.४
		एकुण क्षेत्र. हे.आर.	२.०७.६

अश्या जमीन मिळकती सौ. सोनल उत्तमचंद शाह ऊर्फ सोनल संजय श्रीमांकर व इतर ह्यांच्या मालकीच्या व कबजेवहिवाटीच्या असुन सदर जमीन मिळकतीचा उपभोग आजमितीस सौ. सोनल उत्तमचंद शाह ऊर्फ सोनल संजय श्रीमांकर व इतर हे घेत आहेत. सदर जमीन मिळकतीबाबत उपविभागीय अधिकारी (एस.डी.ओ.) वसई यांच्या समोर शेवटची सुनावणी होऊन सदर जमीन मिळकतीचा निकाल माझे अशील सौ. सोनल उत्तमचंद शाह ऊर्फ सोनल संजय श्रीमांकर व इतर यांच्या बाजुने लागला आहे. माझे अशील हे सदर जमीन मिळकतीचे एकमेव मालक व कायदेशीर धारक असुन त्यांना स्पष्ट, वैध व विक्रीयोग्य हक्क प्राप्त आहेत. सदर जमीन मिळकतीचे प्रकरण हे मा. महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरणासमोर प्रलंबित आहे. माझ्या अशिलांच्या निदर्शनास आले की, काही समाज विघातक व्यक्ती बनावट, खोटे व फसवे कागदपत्रांच्या आधारे सदर मालमत्त बेकायदेशीररित्या विकण्याचा प्रयत्न करीत आहे. तरीही कोणतीही व्यक्ती/पक्ष/संस्था/ संस्था/फर्म/विकासक जर या मालमत्तेबाबत किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत विक्री, अदलाबदल, गहाण, हक्क, भेट, वारसा, ताबा, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, परवाना, हस्तांतरण, ट्रस्ट खालील लाभदायक हक्क किंवा कोणत्याही करार, आदेश, डिक्री किंवा अन्य प्रकारे हक्क असल्याचा दावा करत असेल, तर अशा व्यवहार करणा-या व्यक्तींनी तो पूर्णपणे स्वत:च्या जबाबदारीवर, खर्चावर व जोखमीवर करावा.

तारीख :-१८/०६/२०२६

सही/-
(बी. सी. सोलंकी.)
वकील.

जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, **गाव मौजे पेल्हार ता. वसई , जि. पालघर सर्वे नं. ३५ हि.नं. १४ एकुण क्षे. ३.६७.०० आकार रू. ४. ७३ पै** . या मिळकतीमधून **क्षेत्र ०.४०.०० हे. आर. चौ. मी . लिहुन देणारे श्री. करामत इनायततुल्लाह खान श्री. नूरउल्लाह हाकूए एईननुलाह खान व श्री. हिदायततुल्लाह इनायततुल्लाह खान** व इतर हयांच्या सामाईक मालकी व कब्जे वाहीवाटीची जमीन मिळकत आहे. सदरहु जमिनीचे एकुण क्षेत्रापैकी **क्षे. २० गुंठे** ही जमीन मिळकत **लिहुन देणारे श्री. करामत इनायततुल्लाह खान, श्री. नूरउल्लाह हाकूए एईननुलाह खान व श्री. हिदायतुल्लाह इनायत तुल्लाह खान हे आपल्या हिश्श्याची जमिन मिळकत खरेदीदार श्री. समरजीत मेवालाल यादव, श्री. धर्मेद्रा रविशरण सिंह व श्री. सुशील रवींद्र आव्हाड** हयांस विकण्याचे ठरविले आहे. तरी सदर जमिनीमध्ये इतर कोणत्याही इसमांचे कुठल्याही प्रकारचे हरकत हक्क अधिकार व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **२१ दिवसांचे** आत खालील पत्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी कळवावे अन्यथा तसा कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध नाही व असल्यास तो सोडून दिला आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. हयाची नोंद घेणे.

ॲड. अख्तरजहाँ सैय्यद
पत्ता: शॉप नं. १४, यशोदा कॉम्पेलेक्स,
विठठल मंदिर समोर, वालीव, वसई पु. जि. पालघर
मो. ९२२६५४९२९३.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात कि, **श्रीम. निला प्रभाकर गव्हाणकर, श्रीम. रुपा प्रभाकर गव्हाणकर, श्रीम. निता दिपक गव्हाणकर, श्रीम. माणिक सलील चालाचलकर आणि श्री. चेतन दिपक गव्हाणकर, गाव मौजे वडवली, ता. वसई, जि. पालघर येथील सर्वे क्र. २७, हि. नं. २, एकूण क्षेत्र २१.२०.०० (आर. चौ. मी), आकार ०.४५ रु. पै.**, अशी जमीन मिळकतीचे अर्धा हिस्सा **(५०%) म्हणजेच क्षेत्र १०.६०.०० मालक असून सदर मिळकत विकण्याचे ठरविले आहे.** जर कोणतीही व्यक्ती किंवा संस्था या मालमत्तेवर कोणताही तक्रार/ दावा/ हक्क / शीर्षक/ धारणाधिकार / व्याज असेल तर पुराव्यासह ही सूचना प्रकाशित झाल्यापासून **१५ दिवसांच्या** आत खालील दिलेल्या पत्त्यांवर लेखी कळविण्यात यावे. अन्यथा कोणाचे काही हरकत नाही असे समजुन पुढच्या व्यवहार येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही हरकत स्वीकारण्यात येणार नाही.

स्थळ : वसई रोड **सही/-**
दिनांक:१८/०६/२०२६ **ॲड. बासित अन्सारी**
शॉप नं. २, बाबा नगर, नगिनदासपाडा,
विरार रोड नालासोपारा (प) ४०१२०९

केनरा बैंक Canara Bank
भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

भारत सरकारचा उपक्रम

एआरएम शाखा-मुंबई कॅनरा बँक बिल्डिंग, ४था मजला, आदि मर्झबान पथ, बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१ **ईमेल-**cb2360@canarabank.com
दूर. - ८६५५९४८०१९/५४, **वेब-** www.canarabank.com

विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) आणि ९ च्या तरतुदींन्वये स्थावर/जंगम मिळकतींच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकती या तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहेत, खालील नमूद मिळकतीचा **प्रत्यक्ष कब्जा कॅनरा बँकच्या** प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे त्या **मे. सौम्यता महेंद्र सावंत** (कर्जदार), **श्री. महेंद्र यशवंत सावंत** (सह-अर्जदार), **सौ. मानसी महेंद्र सावंत** (सह-अर्जदार), श्री. महेंद्र यशवंत सावंत यांची पत्नी, रा. २, रुक्मिणी निवास, साई हिल, टेंभीपाडा रोड, भांडुप पश्चिम, एस. ओ. मुंबई-४०० ०७८ किंवा फ्लॅट क्र. ३०१, ३रा मजला, नव श्री गणेश कृपा सीएचएसएल., किमया हॉस्पिटलजवळ, गावदेवी मंदिर, गावदेवी रोड, बदलापूर पूर्व-४२१ ५०३ यांचेकडून **कॅनरा बँकेच्या एआरएम शाखेला** थकबाकी शैक्षणिक कर्जासाठी **रु. ६०,५५,९६७.७७** (रु. साठ लाख पंचावन्न हजार नऊशे सदुसष्ट रुपये सत्याहत्तर पैसे फक्त) (**३१.०५.२०२६ रोजीस** अधिक ०१.०६.२०२६ पासून त्यावरील पुढील व्याज आणि शुल्कांसह) च्या वसुलीकरिता २४.०७.२०२६ रोजी **''जे आहे जेथे आहे'' ''जे आहे जसे आहे''** तत्त्वाने विकण्यात येणार आहेत.

अ. क्र.	मिळकतीचे वर्णन	राखीव किंमत	ईएमडी
१	फ्लॅट क्र. ३०१, ३रा मजला, मोजमापित १०६० चौ. फूट खुल्या टेरेस-सह, **''गणेश कृपा''** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमध्ये आणि **''नव श्री गणेश कृपा सीएचएसएल.''** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीमध्ये असलेला, सर्व्हे क्र. १८, हिस्सा क्र. १ई, प्लॉट क्र. ५, किमया हॉस्पिटलजवळ, गावदेवी मंदिर, गाव देवी रोड, महसुली गाव कुळगाव, तालुका अंबरनाथ, बदलापूर पूर्व-४२१ ५०३ चे सर्व ते भाग आणि विभाग. **मिळकतीच्या सीमाबद्ध :-उत्तर :-** ओंकारेश्वर कृपा सीएचएस, **दक्षिण :-** दुर्वांकुर बंगला, **पूर्व :-** गावदेवी रोड, **पश्चिम :-** रस्ता. **सेरसाई ॲसेट इंटरेस्ट आयडी :** २०००७४४०३४७९	रु. ४०,९४,०००/-	रु. ४,०९,४००/-

इसारा अनामत रक्कम **२३.०७.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी सायं. ५.०० पर्यंत** जमा केले जाईल.

२३.०७.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी सायं. ५.०० वा. पर्यंत सेवा प्रदात्याकडे सादर करावयाच्या ईएमडी आणि इतर कागदपत्रांची माहिती.

बँकेकडे दस्तावेज जमा करण्याची तारीख **२३.०७.२०२६ रोजीस सायं. ५.०० वा. पर्यंत.**

पुढील तपशीलाकरीता कोणत्याही कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत **श्री. सुदर्शन जोशी,** प्राधिकृत अधिकारी, **कॅनरा बँक, एआरएम शाखा, मुंबई (मोबा. क्र. ८६५५९४८०५४)** किंवा **सौ. मोनिका पाहुजा, अधिकारी (मोबा. क्र. ८९८९०१९७५८)** किंवा सेवा पुरवठादार बँकनेट **(मे. पीएसबी अलायन्स प्रा. लि.) (संपर्क क्र. ७०४६६१२३४५ / ६३५४९१०१७२ / ८२९१२२०२२० / ९८९२२१९८४८ / ८१६०२०५०५१,** ईमेल: support.BAANKNET@psballiance.com / support.ebkray@procure247.com) यांच्याशी संपर्क साधावा.

सही/-
दिनांक : १७.०६.२०२६ प्राधिकृत अधिकारी
ठिकाण : मुंबई एआरएम शाखा,कॅनरा बँक

डॉईश बँक एजी

जाहीर सूचना - मिळकतीची लिलाव नि विक्री

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२, अन्वये स्थावर मिळकतीची विक्री

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे मे. डॉईश बँक एजी, त्याच्या व्यवसायाचे एक ठिकाण येथे निरलॉन नॉलेज पार्क, बी१, २रा मजला, गोरेगाव पूर्व, मुंबई ४०००६३ **(''डॉईश बँक एजी'')** चे प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस अँड एन्फार्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ **(''ॲक्ट'')** च्या कलम १३(२) सहवाचता सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ (रुल्स) च्या नियम ३ अन्वये मागणी सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत त्यावरील व्याजासह **१४ मे, २०२१ रोजीस रु. १५,५९,३३,६६५.२/- (रुपये पंधरा कोटी एकोणसाठ लाख तेहत्तीस हजार सहाशे पासष्ट आणि दोन पैसे मात्र)** ची थकबाकी रक्कम चुकती करण्यासाठी कर्जदार/सह-कर्जदारांना बोलविण्याकरीता कर्जदार **मे. टेक केअर मेडिको, श्री. राजेंद्र रमेशचंद्र शाह आणि श्रीम. काजल आर शाह** यांना **१९ मे, २०२६** दिनांकीत मागणी सूचना जारी केली होती.

थकबाकी रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरले. कर्जदार आणि सामान्य नागरिकांना कळविण्यात येते की, सदर ॲक्टच्या नियम ८ सहवाचता ॲक्टच्या कलम १३(४) अन्वये निम्नस्वाक्षरीकारांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून सदर थकबाकी रकमेची वसुली करण्याकरिता खालील उल्लेखित बँकेसह गहाण मिळकतीचा कब्जा घेतला.

आता सर्वसामान्य जनतेला याद्वारे कळविण्यात येते की, मिळकत खाली वर्णन केलेल्या अटी व शर्ती आणि प्रक्रियेनुसार मोहोरबंद पाकिटातून बोली मागवून डॉईश बँक एजी, निरलॉन नॉलेज पार्क, बी१, २ रा मजला, गोरेगाव पूर्व, मुंबई ४०० ०६३ येथे ''जे आहे जेथे आहे'' तत्त्वाने आणि ''जे आहे जसे आहे'' तत्त्वाने विकण्यात येईल.

अ. क्र.	तारण मिळकतीचा पत्ता	राखीव किंमत	इअर	लिलाव दिनांक
१.	मुंबई शहराच्या नोंदणी जिल्ह्यात मलाबार हिल आणि कंबाला हिल विभाग, मुंबई जिल्हा, मुंबई चा कॅडेस्ट्रल सर्व्हे क्र. ४५४ येथे स्थित असलेले आणि वसलेले मातृ आशिष को-ऑप हौसिंग सोसायटी लि., ३९ नेपियन सी रोड, मुंबई ४०० ०३६ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीमधील तळ मजल्यावरील दुकान क्र. ०८ धारक दुकान, मोजमापित एकूण अंदाजे ५०३ चौ. फूट (बिल्ट अप क्षेत्र) क्षेत्रचे ते सर्व भाग आणि विभाग.	रु. ३,५५,००,०००/-	रु. ३५,५०,०००/-	०७ जुलै, २०२६

मिळकतीच्या संबंधातील तपशील बँकेच्या सर्वोत्तम माहिती आणि समजुतीप्रमाणे वर्णन केले आहेत, तथापि सदर तपशिलांमधील कोणत्याही त्रुटी, गैरविधाने किंवा उणिवांसाठी ती जबाबदार नसेल. म्हणून निविदाकार/प्रस्तावकर्ते/संभाव्य बोलीदार/खरेदीदार यांनी त्यांच्या स्वत:च्या हितासाठी निविदा सादर करण्यापूर्वी मिळकतीच्या संबंधातील त्यांची स्वत:ची खात्री करून घ्यावी. बँकेच्या सर्वोत्तम समजुतीप्रमाणे मिळकतीवर कोणतेही भार नाहीत आणि योग्य कायदेशीर प्रक्रिया वापरून मिळकतीची विक्री करण्याचा अधिकार बँकेला आहे.

जाहीर लिलावाच्या अटी आणि शर्ती :

१. मिळकतीचे निरीक्षण **२७ जून, २०२६** रोजी **स. १० वा. ते सायं ५ वा.** दरम्यान करता येईल. **०७ जुलै, २०२६** रोजी किंवा पूर्वी **दु. २ वा.** पर्यंत डॉईश बँक एजी, येथे निरलॉन नॉलेज पार्क, बी१, २रा मजला, गोरेगाव पूर्व, मुंबई-४०००६३ डॉईश बँक एजी च्या कार्यालयात पोहोचतील अशा बेताने ''मे. डॉईश बँक एजी'' च्या नावातील **रु. ३५,५०,०००/- (रुपये पस्तीस लाख पन्नास हजार मात्र)** ही इसारा अनामत रकमेसाठीच्या डिमांड ड्राफ्ट/ पे ऑर्डर सहित निम्नस्वाक्षरीकारांच्या कार्यालयात एका मोहोरबंद पाकिटातून बोली सादर कराव्यात. इसारा अनामत रकमेवर कोणतेही व्याज नसेल.

२. जो प्रस्ताव रितसर भरला जात नाही किंवा इअर सोबत नसलेला प्रस्ताव किंवा येथे नमूद तारिख आणि वेळ नंतर प्राप्त झालेला प्रस्ताव वैध प्रस्ताव मानला जाणार नाही आणि त्यानुसार रद्द केल्या जातील. इअर वर कोणतेही व्याज देय असणार नाही.

३. बोली प्रपत्रासहित प्रस्तावित बोलीदारांनी (पासपोर्ट, इलेक्शन कमिशन कार्ड, रेशन कार्ड, ड्रायव्हिंग लायन्सस इ.) सारखे त्याच्या/तिच्या ओळखीचे पुरावे, वास्तव्याचे पुरावे आणि आयकर विभागाने जारी केलेल्या पॅन कार्डची प्रत जोडावी.

४. विक्रीच्या तारखेस, रितसर प्राप्त झालेल्या सर्व बोली उघडल्या जातील आणि राखीव किंमतीच्यावर असल्यास, सर्वोच्च बोलीदारांची बोली बँकेकडून स्वीकारली जाईल. तथापि, लिलावाच्या ठिकाणी व्यक्तिश: हजर असलेल्या बोलीदारांना सर्वोच्च बोलीदारांनी देऊ केलेल्या किंमतीपेक्षा किमान **रु. १,००,०००/- (रूपये एक लाख मात्र)** जास्त रक्कम देऊ केल्यास त्यांची बोली किंमत पुढे वाढविण्याचा अधिकार असेल आणि अशा त्याहून जास्तीची बोली स्वीकारण्याचा अधिकार बँकेला असेल. बँकेने विक्री संमत केल्यानंतर, खरेदीदारांना विक्री किंमतीच्या २५% (पंचवीस टक्के) निम्नस्वाक्षरीकारांकडे तात्काळ इसारा अनामत रक्कम समायोजित करून भरावी लागेल.

५. त्यांना योग्य आणि वाजवी वाटतील अशा अटी व शर्तीच्या अधीन त्यांच्या स्वेच्छेने बँक मुदतवाढीच्या विनंतीस मान्यता देऊ शकते. खरेदीची उर्वरित किंमत रक्कम खरेदीदारांनी मिळकतीच्या विक्रीच्या मंजुरी नंतर पंधराव्या दिवशी किंवा त्यापूर्वी किंवा पक्षकारांनी लेखी स्वरूपांत कबूल केलेल्या वाढीव मुदतीत बँकेला प्रदान करायची आहे. निर्धारित कालावधीत संपूर्ण मोबदला रकमेचे प्रदान करण्यांत कसूर केल्यास बँक इ.अ.र आणि/किंवा खरेदीदारांनी केलेले अन्य कोणतेही प्रदान जप्त करण्यास आणि मिळकतीचा पुनर्लिलाव करण्यास मुक्त असेल. कसूरवार खरेदीदारांना मिळकतीवरील किंवा त्यानंतर ती ज्या रकमेस विकली जाईल त्यापैकी कोणत्याही हिश्श्यावरील अधिकार उरणार नाहीत.

६. खरेदीदारांनी सर्व प्रदान ''डॉईश बँक एजी''च्या नावातील डिमांड ड्राफ्ट/पे ऑडरच्या माध्यमातून केले पाहिजे.

७. संपूर्ण विक्री किंमत मिळाल्यावर, बँक खरेदीदार/त्यांचे नामनिर्देशिती यांच्या नावे एक विक्री प्रमाणपत्र जारी करेल आणि खरेदीदारांना मिळकतीचा कब्जा सुपूर्द करेल.

८. वरील परिशिष्टात वर्णन सदर स्थावर मिळकत निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकारी द्वारे विक्रीची निश्चिती झाल्याच्या तारखेपासून आग किंवा चोरी किंवा अन्य अपघात यामुळे नुकसान किंवा हानी यासारख्या मिळकतीशी संबंधित सर्व जोखिमींच्या सर्व बाबतीत मिळकत खरेदीदारांकडे निहित असेल आणि राहील. कोणत्याही कारणाने खरेदीदारांना विक्री रद्द करता येणार नाही.

९. इअर प्रती जमा केलेले डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर अयशस्वी बोलीदारांना परत केले जातील.

१०. सर्व हेतू करीता सदर मिळकत विक्री जे आहे जेथे आहे तत्वावर करण्यात येईल. बँकेच्या प्राधिकृत अधिकारीच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहिती नुसार सदर मिळकतीवर कोणताही इतर भार नाही.

११. सदर स्थावर मिळकतीच्या संबंधातील मुद्रांक शुल्क, नोंदणी आकार, हस्तांतरण आकार आणि अन्य कोणतेही आकार यासाठीचा सर्व खर्च खरेदीदारांनी करावयाचा आहे. मिळकतीच्या संबंधातील पालिका कर, मेन्टेनन्स/सोसायटी चार्जेस, वीज आणि पाणी कर, उपकर किंवा अन्य कोणतीही थकबाकी यासारखी सर्व देणी यशस्वी खरेदीदारांनी प्रदान करावी लागतील.

१२. कोणतीही किंवा सर्व प्रस्ताव किंवा सर्वोच्च प्रस्ताव स्वीकारण्यास बँक बांधील नसेल आणि कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली फेटाळण्याचा तिचा अधिकार बँक राखून ठेवत आहे.

१३. बोलीदारांना स्वत: किंवा त्यांचे रितसर प्राधिकृत प्रतिनिधी यांच्याशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीला विक्री प्रक्रियेत सहभागी होण्याची अनुमती दिली जाणार नाही.

१४. जर बँकेने केलेला सर्व परिव्यय, प्रभार आणि खर्चासह एकत्रित संपूर्ण थकबाकी हि ॲक्टच्या कलम १३(८) अन्वये मिळकतीच्या विक्रीसाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी वरील नावाच्या कर्जदारांनी भरणा केली तर मिळकत विकली जाणार नाही आणि संभाव्य बोलीदारांकडून प्राप्त झालेल्या सर्व बोली बँकेविरूद्ध कोणत्याही दायित्व/दाव्या शिवाय त्यांना परत केल्या जातील.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) आणि ९(१) अन्वये वरील उल्लेखित कर्जदारांना ही एक सूचना देखील आहे.

डायना नाडार, प्राधिकृत अधिकारी -डॉईश बँक एजी
ईमेल : diana.nadar@db.com

ठिकाण : मुंबई संपर्क क्रमांक: ९८२००६६६१३, ९६१९८७७०७, ९१५२७७०६०७, ९८२१६०००२९, ०२२ ७१८० ३१६७/३७२७/३०७७/३४७९.
दिनांक : १८.०६.२०२६